मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३३९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# डोळे पाणावले, कंठ दाटला... ही शेवटची भेट समजा...

## तर जालन्याला बट्टा लागेल, महाराष्ट्र बदनाम होईल - राठी

### सर्व शेतकऱ्यांची गुरे-ढोरे, वाहने, शेतजमिनीचे जिल्हाधिकाऱ्यांना दानपत्र लिहून देणार; अन् आत्मदहन

**जालना । प्रतिनिधी -** 'समजानेसे अगर लोग समजते तो बासुरीवाला महाभारत नही होणे देता' हे बुधवारचे महाभारत होऊ द्यायचे नसेल तर शासनाने वेळीत तोडगा काढवा, अन्यथा गुरे-ढोरे, वाहणे, शेतजमिनी ह्या जिल्हाधिकाऱ्यांच्या हक्कात दानपत्र लिहून देऊन त्याच ठिकाणी आत्म दहन करण्याचा ईशारा शेतकरी संघर्ष समितीचे दिलीप राठी यांनी सोमवार (दि १४) रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिला. यावेळी श्री राठी यांनी ही शेवटची भेट समजा असे म्हणतांना त्यांचे डोळे पाणावले होते तर कंठ ही दाटून आला होता.

या पत्रकार परिषदेला गणेश महाराज कोल्हे, बळीराम कदम आदींसह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

जालना तालुक्यातील जवळपास तीनशेवर शेतकऱ्यांनी दिलीप राठी यांच्या नेतृत्वात शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने आंदोलन सुरु केले आहे. समृद्धी बाधीत शेतकऱ्यांच्या धरणे आंदोलनाला ७५ दिवस पूर्ण होत आहेत. असे असले तरी शासनाने जमिनीच्या रास्त मुल्यांकनाचा प्रश्न सोडवलेला नाही. दिलीप राठी यांच्या आंदोलनाला व्यापारी संघटनांनी सामाजिक संघटनांनी समर्थन दिलेले आहे. अडीच महिन्यांनंतरही शासनाने त्यांच्या आंदोलनाची दखल न घेतल्यामुळे शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने टोकाचे पाऊल उचलण्याचा निर्णय झाला असल्याची माहिती श्री राठी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री राठी म्हणाले की, पहिल्या टप्प्यात झालेल्या आंदोलनादरम्यान आ. अर्जुनराव खोतकर यांनी मध्यस्थी केली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी सकारात्मक भूमिका घेतली होती. त्यामुळे शासनाला एक महिन्याचा वेळ देऊन आंदोलन स्थगित केले होते. मात्र, महिन्याभरानंतरही मागण्या मान्य झाल्या नाहीत. त्यामुळे पुन्हा दुसऱ्या टप्प्यात आंदोलन सुरु करावे लागले या आंदोलनाला आता अडीच महिने होत आहेत. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे का अडून बसले हे कळायल मार्ग नाही. मध्यंतरी शासनाने ६७ लोकांची कामे केल्याचे सांगितले

पान २ वर

### पुढाऱ्यांनी लक्ष दिले नाही याची खंत - राठी

जालना जिल्ह्याचा विचार करता येथे पाच आमदार आहेत. त्यापैकी समृद्धी बाधीत शेतकऱ्यांच्या जमिनी असलेल्या जालना, घनसावंगी, परतूर या ठिकाणचे आमदार आहेत. असे असले तरी आ. अर्जुनराव खोतकर यांच्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही आमदारांनी विधानसभेत प्रश्न लावून धरला नाही. येत्या १६ तारखेला होणारे आंदोलन हे शेवटचे आंदोलन असून ज्यांनी ज्यांनी आमचे म्हणजेच शेतकऱ्यांचे प्रश्न लावून धरले. त्या सर्वांचे आभार व्यक्त केले. मात्र, ज्या पद्धतीने पुढाऱ्यांनी प्रश्न लावून धरायला पाहिजे होते तसे धरले नाहीत. तेथे ते कमी पडल्याची खंत श्री राठी यांनी व्यक्त केली.

### आता... बा... विठ्ठलाच्या दरबारात...



समृद्धी बाधीत शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी गेल्या अडीच महिन्यांपासून आंदोलन सुरु आहे. सोमवार (दि १४) रोजी शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने पत्रकार परिषद आयोजित करून गुरे-ढोरं, शेतजमिनी, वाहने आदी जिल्हाधिकारी यांच्या हक्कात दानपत्र लिहून देऊन आत्मदहनाचा ईशारा देण्यात आला. ऐरवी आंदोलनस्थळी शेतकरी संघर्ष समितीचे बॅनर झळकतांना दिसून येत होते. मात्र, आता शेतकऱ्यांचे आराध्य श्री विठ्ठलाची प्रतिमा ठेवण्यात आली होती. त्यामुळे या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी आता न्याय बा... विठ्ठलाच्या दरबारात असाच संदेश देऊन त्यांचा निर्धार तर दर्शविला नसेल?

युवा आदर्श

**मूल्य ...**

छोट्या घटक पक्षांचे
चाणाक्य जाणे मूल्य
मूल्यापेक्षा अधीकचं
असते उपद्रव मूल्य
आपल्या गटा सामील
पणा लागते कौशल्य
वापर करुन फेकता
भलते टोचणारे शल्य
किती वर्षे गेली तरीही
संपेना अवस्था बाल्य
कुणाचा किती वापर
तत्व जाणते कौटिल्य
छोटे पक्ष छोटेच रहावे
क्षीण करतात दौर्बल्य
मते फुकाची खायची
योगदान हेचि अमूल्य
स्वर यंत्रात बिघाड करे
इप्सित होई साफल्य
कधी भांडे ते उच्चारवे
दाखवी चातुर्य चापल्य
काही काही विभागात
छोट्यांचे मोठे प्राबल्य
मते तिथली हळू ओढा
संगम साधता बाहुल्य
लहानपक्षा अस्थिरता
अंगा कुंपणी चांचल्य
रोमा रोमात भरलेली
चंचल स्वभावी तारल्य

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### फेरीवाल्यांच्या मागण्यांसाठी आझाद मैदानावर पथ विक्रेता संघटना व संस्थेचे आंदोलन

## फेरीवाल्यांनी सहभागी व्हावे- सुर्यवंशी

**जालना । प्रतिनिधी -** देशातील पथ विक्रेत्यांनसाठी भारत सरकारने सन २०१४ रोजी पथ विक्रेता (उपजिवीका रक्षण व संसाधनांचे संरक्षण विनियमन ) अधिनियम २०१४ लागू होऊन ११वर्ष झाली आहेत. मात्र त्यांची अंमलबजावणी होत नाही.

केंद्र सरकारने फेरीवाला व्यवसायासाठी पी एम स्वनिधी व इतर अनेक योजना आणल्या कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे . मात्र, पुणे , मुंबई , छत्रपती संभाजी नगर, धुळे सांगली अमरावती कोल्हापूर नंदुरबार बारामती दौंड जेजुरी सासवड भोर खोपोली लोणावळा अहिल्यानगर , सोलापूर, बुलढाणा, ठाणे, नवी मुंबई, नागपूर, यवतमाळ, सह इतर शहरांमध्ये महापालिका नगरपालिका आणि पोलिस प्रशासन या व्यावसायिकांबाबत अन्यायकारक भूमिका घेत आहेत. गेल्या तीन महिन्यांपासून , पुणे , मुंबई , छत्रपती संभाजी नगर, धुळे सांगली अमरावती कोल्हापूर नंदुरबार बारामती दौंड जेजुरी सासवड भोर खोपोली लोणावळा अहिल्यानगर , सोलापूर, बुलढाणा, ठाणे, नवी मुंबई, नागपूर, यवतमाळ, जालना शहरातील विविध भागात अधिकृतपणे वर्षानुवर्षे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना उठवण्यात येत आहे. या विरोधात आता हातगाडी फेरी पथारी स्टॉलधारक १५ जुलै रोजी आझाद मैदानावर आंदोलन करणार आहे असा इशारा राज्यातील विविध संघटना, संस्था व फेरीवाला संघटनांनी आणि हॉकर्स जॉइंट एक्शन कमिटी महाराष्ट्र राज्याच्या नेतृत्वाखाली संजय शंके कार्यवाह जाणीव संघटना यांच्या मार्गदर्शनाखाली मा श्री लक्ष्मण माने सचिव हॉकर्स जॉइंट एक्शन कमिटी महाराष्ट्र राज्य व मा श्वेता ओतारी अध्यक्षा जाणीव महिला संघटना यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हा प्रमुख तालुका प्रमुख हे नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात येणार असल्याचे हॉकर्स जॉईट एक्शन कमिटी चे मराठवाडा अध्यक्ष धनसिंह सुर्यवंशी यांनी कळविले आहे.



गेली ३० ते ४५ वर्षे पासून हजारो हातगाडी पथारी स्टॉलधारक फेरीवाले महानगरपालिका व नगरपालिका रस्त्यांवर पदपथावर व्यवसाय करीत आहेत. एका बाजूला शासन स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या योजना आखत आहे, तर दुसऱ्या बाजूला फेरीवाल्यांना उदवस्त करण्याचे काम महानगरपालिका , नगरपालिका व पोलीस करत असल्याचा आरोप फेरीवाल्यांकडून होत आहे.

फेरीवाल्यांना न्याय द्यावा. महापालिकेने योग्य सर्व्हे करावा, योग्य ते शुल्क आकारून शासकीय महसूल वाढवावा. मात्र, फेरीवाल्यांना शिक्षा करणे, वाटेल तसा माल उचलणे, दंड लावणे, अशी अन्याय्य करवाई करू नये, हॉकर्स जॉइंट एक्शन कमिटी महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या मागण्या आहेत त्याचबरोबर

पान २ वर

### राज्यातील शिक्षकांना केंद्रीय कर्मचाऱ्यांचे लाभ मिळवून देण्यात अखिल महाराष्ट्र शिक्षक संघाची भूमिका महत्त्वाची: राज्याध्यक्ष देविदास बसवदे



**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील प्राथमिक शिक्षकांना केंद्रीय कर्मचाऱ्याप्रमाणे सर्व लाभ मिळवून देण्यासाठी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाने नेहमीच पुढाकार घेतला आहे.मग राज्यातील प्राथमिक शिक्षकांना वेतन आयोगाचे लाभ असो की पदोन्नती किंवा जुन्या पेन्शन योजनेचे लाभ असो यासाठी अखिल भारतीय शिक्षक शिक्षक संघाच्या माध्यमातून आपली संघटना सातत्याने काम करीत आहे. असे विचार अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष तथा अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष देविदास बसवदे यांनी व्यक्त केले.ते रविवारी जालना येथील जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित स्व. अरुण दोंदे व स्व. सुलभा दोंदे यांच्या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमाला ते संबोधित करीत होते.अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या जालना शाखेतर्फे आयोजित या कार्यक्रमात सर्वप्रथम शिक्षक नेते स्व. अरुण दोंदे व स्व.सुलभा दोंदे यांच्या प्रतिमेचे पूजन केल्या गेले. दोंदे परिवाराच्या भरीव योगदानामुळेच आजपर्यंत राज्यातील शिक्षकांचा आवाज केवळ देशपातळीवरच

पान २ वर


### राज्यातील भारतीय मुस्लीम समाजाला गोशाळा चालविण्यासाठी देण्याची द्या - तय्यबबापू देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील भारतीय मुस्लीम समाजला गोशाळा चालविण्यासाठी देण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार जालना शहर उपाध्यक्ष तय्यबबापू देशमुख यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील भारतीय मुस्लिम समाज येथे पीढी ना पीढी येथे राहात आहेत.



व या मातीतच दफन होतात. त्यामुळे आपण मुस्लिम समाजाला गोशाळा व गोरक्षकाची जबाबदारी द्यावी. ज्या प्रमाणे हिंदू समाजाला गोशाळा व गोरक्षक ची

पान २ वर



# संपादकीय

## महाराष्ट्राचा विवेकी आवाज

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज जयंती. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला. शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते. आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# आरोग्यासाठी उपयुक्त... रानभाज्या



**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा.८९९९५६६९१७**

पावसाळा सुरू झाला की महिनाभरात जुलै ऑगस्ट आणि सप्टेंबर मध्ये करटुले, दुडीची फुले ही भाजी मिळायला लागते. कारण ही भाजी राना वनातून, शेताच्या बंधाऱ्यावर, काट्याकुपाठ्यात ही भाजी येत असते. त्यामुळे आदिवासी, भिल्ल, मंडळी ही भाजी मिळवून बाजारात आणतात म्हणून ती आपल्याला मिळते. जळगाव जिल्ह्यात जामनेर. रावेर. यावल येथे, नाशिक जिल्हा,विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली,नंदुरबार, शहादा, पालघर, ठाणे, अकोला, व आजूनही काही जिल्ह्यांमध्ये ही भाजी दिसते. सिझन मध्ये ही भाजी खावी अतिशय चविष्ट अशी भाजी असते आणि आरोग्याला उपयोगी अशी आहे .

कर्टुल्यांचीभाजी... कर्टूले, कटुर्ले,कंटोली, नावाने ओळखली जाणारी ही आरोग्यासाठी उपयुक्त आणि शक्तिशाली भाजी मानली जाते. कारण त्यात मल्टीविटामिन, लोह आणि अनेक पौष्टिक घटक असतात.

हिरव्या रंगाची वरुन बारीक मुलायम काटेरी आवरण , असणाऱ्या भाजीमध्ये भरपूर व्हिटॅमिन सी असते, तिला सर्वोत्तम भाजी म्हणतात. वेगवेगळ्या भागात त्याला वेगवेगळे नाव आहे. जेवणात ती चविष्ट लागते. त्यात आरोग्यासाठी खजिनाही आहे. लठ्ठपणा, मधुमेह, बीपी नियंत्रण, कॅन्सर, फ्लू यांसारख्या अनेक मोठ्या आजारांवर ती रामबाण उपाय ठरते. बरेच लोक याला व्हेज चिकन देखील म्हणतात. मात्र, ज्या पद्धतीने ते बनवले जाते त्याप्रमाणे त्याची चव वाढते.गरम पोळी,भाकरी बरोबर ही भाजी छान लागते.

या भाजीमुळे डोकेदुखीमध्ये आराम मिळतो, मायग्रेनसारखे आजारही दूर होतात. यामध्ये अँटिऑक्सिडेंट गुणधर्म असून त्यामुळे त्वचाही चांगली राहते.मुळव्याध, बद्धकोष्ठता या तक्रारीतही ही फायदेशीर आहे, ज्यांना मलावरोधाचा त्रास होत असेल त्यांनी हे रोज खावे कारण यामध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते. फायबर, फॅट आणि प्रथिने भरपूर असतात.भाजीची आवक कमी असल्याने कुठे पन्नास रुपये, तर कुठे ऐंशी.. शंभर रुपये पाव ही




भाजी विक्री होते. शहरी भागात कमी आढळते. आता काही ठिकाणी कर्टुल्यांचे कंद विकसीत करुन बियाणे तयार करून विक्री साठी उपलब्ध आहेत. दोन तीन ठिकाणी प्रायोगिक तत्वावर शेती केल्याचे वाचण्यात आले.

दुडीची फुलांची भाजी...किती लोकांनी दुडीच्या फुलांची भाजी खाल्ली आहे?
दुडी, दोडी, दवडी, झुटेल, जिवतीची फुलं अशी विविध नावं या फुलांची आहेत. ही फुलं खूप दुर्मिळ आहेत, बाजारात सहसा लवकर उपलब्ध होत नाही. विशेषतः पावसाळ्याच्या सुरुवातीला ही फुलं येतात. रानात किंवा शेताच्या बांधांवर या फुलांची वेल असते. वर्षभर ही वेल वाळलेली असते आणि पावसाळ्यात हिरवीगार होउन जुलै महिन्यात फुलांनी बहरते. या फुलांची भाजी खूप चविष्ट आणि रुचकर बनते. एकदा ज्याने या भाजीची चव घेतली परत परत खावी वाटते. साधारणपणे श्रावण आणि भाद्रपद महिन्यात दुडीची फुले मिळतात. या फुलांची आवक कमी असल्यामुळे तशी ती महागच मिळतात. ४० ते ६० रुपये पाव म्हणजे दोनशे सव्वा दोनशे रुपये किलो जवळपास मिळतात.गरमागरम पोळी,भाकरी बरोबर ही भाजी छान लागते.

हादग्याच्या फुलांची भाजी...वात दोष कमी होण्याकरिता हादग्याचे सेवन फायदेशीर असते. कफ व पित्तदोष कमी करण्यासाठी हादग्याच्या फुलांच्या भाजीचा चांगला उपयोग होतो. हादग्याला 'अगस्ता' असेही म्हणतात. या लहान वृक्षाची लागवड घराभोवती, परस बागेत, तसेच शेताच्या बांधावर करतात. हादग्याचा वृक्ष २५ ते ३० फुटांपर्यंत उंच वाढतो. हा वृक्ष जलद वाढतो, पण त्याचे आयुष्यमान कमी असते. खोड व फांद्या नाजूक व ठिसूळ असतात. फांद्या खोडाच्या वरील भागात पसरणाऱ्या व खाली झुकलेल्या असतात. शेंगा हादग्याला सप्टेंबर ते जानेवारी महिन्यात फुले येतात. थंडी वाजून येणाऱ्या तापावर हादग्याच्या फुलांची भाजी उपयुक्त आहे. याच्या सेवनाने सर्दीचा त्रास कमी होतो. भूक लागत नसल्यास, पोट साफ होत नसल्यास हादग्याच्या भाजीने चांगला गुण येतो. स्त्रियांच्या पाळीतील अनियमितता अथवा पाळीसंबधी तक्रारी या भाजीच्या सेवनाने कमी होतात.

हादग्याच्या फुलांत 'अ' जीवनसत्त्वाचे प्रमाण भरपूर असल्यामुळे त्याच्या अभावाने निर्माण होणारे आजार टाळण्यासाठी या भाजीचे नियमित सेवन केल्यास रुग्णाचा त्रास कमी होतो. हादग्याच्या फुलाचे भजीही चविष्ट लागतात.

चिवळची भाजी...चिवळ ही वनस्पती ओलसर, पाणथळ जागेत शेतात व बागेत तण म्हणून वाढते. चिवळ कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, खानदेश या ठिकाणी महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात वाढते.
ही वनस्पती जमिनीवर पसरत वाढते. ही अगदी नाजूक असते. खोडांचा,पानांचा आकार लहान असतो.
चिवळ या वनस्पतीच्या बिया मूत्रपिंडाचे विकारात वापरतात.
दातांतून, कफातून तसेच लघवीतून रक्त जात असल्यास ते बंद करण्यास चिवळीचा रस देतात.
मार लागल्यास, ठेच लागल्यास दाह आणि सूज कमी करण्यासाठी ही वनस्पती वाटून त्यावर बांधतात.
चिवळ ही वनस्पती मूळव्याधीवर गुणकारी आहे.
चिवळची भाजी शीतल, आणि रक्तशुद्धी करणारी आहे.
रक्तपित्तात ही भाजी प्रशस्त तर ज्वरात पथ्यकर आहे.
चिवळीची भाजी शरीरातील उष्णता कमी करणारी व लघवी साफ होण्यासाठी उपयुक्त आहे.
लघवीची, हातापायांची व डोळ्यांची होणारी जळजळ चिवळच्या भाजीने कमी होते.
चिवळी वनस्पतीमध्ये मज्जासंस्थेवर प्रभावी कार्य करणारे; तसेच कर्करोग प्रतिबंधक गुणधर्म असल्याचे अलीकडील संशोधनावरून सिद्ध झाले आहे.

लाल माठ भाजी ..लाल भाजी, श्रावणी माठ असेही म्हटले जाते. या भाजीची.. कोवळी पाने व कोवळे देठ खाण्यायोग्य असतात. जुलै-सप्टेंबर या कालावधीत जंगलात उपलब्ध असते. लोह, अ, ब, व क आदी कॅल्शिअम, मॅग्रेशिअम, फॉस्फरस, झिंक यात आहेत.

गुळवेल ची भाजी... गुळवेलाला वारुडवेल, अमृतवेल, अमृतवली गुडूची असेही म्हटले जाते. या भाजीची कोवळी पाने खाल्ली जातात. ही भाजी वर्षभर उपलब्ध असते. या भाजीमध्ये




कारल्याची भाजी... कारल्याचे फळ थंड व पौष्टिक असून ते खाल्ल्यावर पचनक्रिया सुधारते. खोकला, पित्त, सांधेदुखी, त्वचारोग, कुष्ठरोग, बद्धकोष्ठता, मधुमेह इ. विकारांवर ते गुणकारी असते.
कारल्याचे किंवा कारल्याच्या रसाचे नियमित सेवन करणाऱ्याचे वजन कमी होते.
कारल्यात अ, ब आणि क ही जीवनसत्त्वे असतात.
काल्र्याने पचन क्रिया सुधारते. निरोगी राहण्यासाठी, हिरव्या भाज्या आणि फळे खाण्याची शिफारस करतात. फळे आणि भाज्या खाऊन निरोगी राहा. फळे आणि भाज्यांमध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक असतात. आजी अनेकदा मुलांना कारले खाण्याचा सल्ला देतात. कारले कडू असले तरी अनेक गुणांनी समृद्ध आहे. कारल्याचे सेवन करण्याचे अनेक फायदे आहेत. कारले खाल्ल्याने वजन कमी होते आणि कोलेस्ट्रॉलची पातळीही कमी होते. कारले हृदय गती निरोगी ठेवण्यासाठी देखील उपयुक्त आहे. पण जर तुम्हाला असे वाटत असेल की अधिक प्रमाणात कारले खाल्ल्याने तुमचे आरोग्य चांगले राहील, तर चुकीचे आहे.

तांदुळजाची भाजी... तांदूळजाही भारतात उगवणारी एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. याचा रानभाजी म्हणून समावेश होतो. ही भाजी मधुर रसाने समृद्ध आहे ताप गोर कांजणे, नेत्रविकार, पित्त विकार ,मुळव्याध, यकृत विकारात ही उपयोगी आहे. त्वचेचे विकारात या भाजीचा उपयोग होतो. त्यामुळे दाह कमी होतो. म्हणून ही भाजी महत्त्वाची आहे. नाजूक प्रकृतीच्या व्यक्ती गरोदर स्त्रिया तसेच डोळ्याच्या विकारात पाणी येणे, ही भाजी उपयोगी आहे. वयस्कर माणसासाठी ही भाजी आरोग्यासाठी उपयोगी आहे.

कॅल्शिअम, जीवनसत्त्व अ आणि क, प्रथिने, लोह, फॉस्फरस, तंतूमय पदार्थ व अँन्टिऑक्सिडेंट आहेत.

तरोट्याची भाजी... तरोटा या रानभाजीला टाकळा, तरवटा, चक्रमर्द आदी नावानेसुद्धा ओळखले जाते. या वनस्पतीचे शास्त्रीय नाव कॅशिया टोरा आहे. ही एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. हिच्या कोवळ्या पानांची भाजी करतात. ती पौष्टिक व वातनाशक आहे.
तसेच चिगोळ अंबाडी या बाजारी उपयुक्त आहे.
रान भाज्यांची ओळख व्हावी म्हणून अनेक ठिकाणी रानभाजी महोत्सव आयोजित केली जातात .आताही जळगाव, अकोला, लातूर, नांदेड, रत्नागिरी, राजापूर, वेंगुर्ला, कल्याण, पालघर, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, अमरावती, बुलढाणा, वाशीम, सोलापूर, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा आदी सर्वच जिल्ह्यात कृषी विभागामार्फत अशा भाज्यांचे महोत्सव भरवले गेले आहेत. जेणेकरून सगळ्यांना या रान भाज्यांची ओळख होईल आणि त्या खाण्यास ते प्रवृत्त होतील. कारण अजून बऱ्याच भागामध्ये आणि बऱ्याच लोकांना या भाज्यांची ओळख नाही, ती व्हावी म्हणूनच असे प्रयत्न केले जातात. ह्या भाज्यांची ओळख व्हावी म्हणून या लेखाद्वारे माहिति संकलीत करून दिलेली आहे. रोगप्रतिकार शक्ती वाढण्यासाठी फायबर तसेच सर्व प्रकारची सूक्ष्म अन्नद्रव्ये मिळण्या करिता रानभाज्या खाव्यात. कोवळ्या अवस्थेतील रानभाज्या आरोग्याच्या दृष्टीने अधिक फायदेशीर असतात.याव्यतिरिक्त अजूनही नंदुरबार, शहादा, गडचिरोली, कोकणात, बऱ्याच रानभाजी आहेत.

Email ID
dilipdeshpande24gmail.com

## पान १ वरुन

### भारतरत्न डॉ. ...

निबंधाचे एक पुस्तक व्हावे आणि त्याचा जागर व्हावा ही इच्छा व्यक्त करतानाच. महाराष्ट्राच्या सर्व लायब्ररीमध्ये गेले पाहिजे की भावना त्यांनी व्यक्त केली. या प्रतिसादाला लगेच प्राध्यापक दत्ता देशमुख यांनी साथ देऊन सांगितले की या पुस्तकासाठी मी सहकार्य करण्यास तयार असून, यशवंत सोनवणे यांनी प्रकाशन ची जबाबदारी सांभाळण्याचे सुद्धा सुतवाच केले. याप्रसंगी समन्वयक शिक्षक शिक्षक क्लबचे सदस्य निवड समितीचे सदस्य यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सर्वप्रथम सामाजिक शास्त्र विषयांमध्ये पहिल्या तीन विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विशेष कार्य लक्षात घेऊन विशेष सन्मान करण्यात आला त्यामध्ये, काजळा येथील आदर्श मुख्याध्यापक आर आर जोशी, टेंभुर्णी येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्रचार्य प्राध्यापक दत्ता देशमुख, अशोक कुंडलिक खरात, प्रकाश कुंडलकर आदींचा यथोचित विशेष सन्मान करण्यात आला. समन्वयकांच्या सत्कारामध्ये कोकण विभागाचे संदीप इंगोले, पश्चिम महाराष्ट्र विभागाचे अशोक माधवले, उत्तर महाराष्ट्र विभागाचे आप्पासाहेब मुळे, मराठवाडा विभागाच्या श्रीमती मंदाकिनी खलसे, विदर्भ विभाग पठाण साधित, अधिसरांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर अनुजा उंचे विलास गुजर, सचिन नीसर्गन, विलास जमदाडे यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साजिद पठाण सर व आप्पासाहेब मुळे यांनी केले तर, माधवले सर यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप इंगोले सर, डॉक्टर सुनंदा मेहेत्रे मॅडम, श्रीमती कवानकर मॅडम, तसेच शंभर शिक्षक क्लबचे सर्व सन्माननीय सदस्य यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरुन

### डोळे पाणावले ...

मुळात त्यांनी ६७ कामे केली ती केवळ २०-२५ शेतकऱ्यांची होती. तिकडे उपमुख्यमंत्री अजित पवार हे भरभरून निधी देत आहेत त्यांच्याकडे तिजोरीच्या चाब्या आहेत. मात्र, मराठवाड्याकडे दूर्लक्ष करत आहेत.

सभागृह सुरु होऊन दोन आठवडे झालेत. आ. अर्जुनराव खोतकर यांनी सभागृहात मुद्दा मांडला असला तरी त्यावर ठोस निर्णय अद्याप झालेला नसल्याचेही श्री राठी यावेळी म्हणाले.

येत्या १६ तारखेला शेती अवजारे, गुरे-ढोरं, वाहने ही दानपत्रात जिल्हाधिकारी पांचाळ यांच्या नावे करुन त्याच ठिकाणी आत्मदहन करणार असल्याचा ईशारा त्यांनी यावेळी दिला.

मुख्यमंत्र्यांकडेच गृह खाते आहे त्यामुळे ते आंदोलन हाणून पाडण्याचा पूर्ण प्रयत्न करतील मात्र, आम्ही ठाम आहोत. जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व दानपत्रात लिहून देऊन आत्म दहन करणार आहोत. जर मध्ये कुठे अडवणूक करण्याचा प्रयत्न पोलीस प्रशासनाने केला तर ज्या ठिकाणी अडवतील त्याच ठिकाणी आत्मदहन करू.

आत्मदहनाच्या ईशाऱ्याऐवजी आमदारांचा राजीनामा का मागत नाहीत असा प्रश्न श्री राठी यांना विचारला असता ते म्हणाले की, १६ तारखेपुर्वी निर्णय झाला नाही तर होणाऱ्या आंदोलनामुळे जालन्याला बट्टा लागेल, महाराष्ट्र बदनाम होईल आणि याची संपूर्ण जबाबादारी ही मुख्यमंत्र्यांसह जिल्ह्यातील आमदारांची राहील आणि त्यानंतर आमदारांचाच काय तर मुख्यमंत्र्यांचा राजीनामा ही राज्य मागेल.

### फेरीवाल्यांनी ...

१५ जुलै रोजी छत्रपती शिवाजी पार्क मैदान, येथे एक दिवशी आंदोलन करण्यात येणार आहे, असे हॉकर्स जॉइंट एक्शन कमिटी महाराष्ट्र राज्य तर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

या आंदोलनात जाणीव हातगाडी फेरी पथारी स्टॉलधारक संघटना व दिलासा जन विकास संस्थेने पाठिंबा दिला आहे.

मा श्री मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात येणार आहे. निवेदनात सविस्तर मागण्या सादर करण्यात येणार आहे

१) महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिका स्तरावरील अतिक्रमण निर्मूलन विभागाची कारवाई तातडीने थांबविणे व जप्त साहित्य विनाशुल्क परत करावे २) केंद्र सरकारचा पथ विक्रेता ( उपजिवीका रक्षण व संसाधनांचे संरक्षण विनियमन) अधिनियम २०१४ राज्यात तातडीने लागू करणे. ३) केंद्र सरकारचा पथ विक्रेता ( उपजिवीका रक्षण व संसाधनांचे संरक्षण विनियमन) अधिनियम २०१४ नुसार केंद्र सरकारचा पथ विक्रेता ( उपजिवीका रक्षण व संसाधनांचे संरक्षण विनियमन) योजना २०२५ आम्ही सादर केली आहे. ती राज्यात तातडीने लागू करणे. ४) केंद्र सरकारचा पथ विक्रेता ( उपजिवीका रक्षण व संसाधनांचे संरक्षण विनियमन) अधिनियम २०१४ नुसार जी योजना लागू करण्यात येईल. त्या नुसार पुढील १) पथ विक्रेता बायोमेट्रिक पद्धतीने सर्वेक्षण करणे २) पथ विक्रेत्यांना नव्याने प्रमाणपत्र वितरण करणे ३) नाममात्र शुल्क नव्याने आकारणी करणे ४) नव्याने पथ विक्रेता क्षेत्र निर्माण करणे ५) पथ विक्रेता व त्यांच्या संसाधनांचे रक्षण करणे ६) मान्य पथ विक्रेता क्षेत्रात पुढील सुविधा उपलब्ध करून देणे ७) स्वच्छ पाणी पुरवठा ८) ड्रेनेज लाईन टाकणे ९) स्त्री व पुरुष स्वच्छतागृह १०) ऊन वारा पाऊस यांपासून संरक्षण करण्यासाठी छत ११) लाईट व्यवस्था १२) सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत १३) पथ विक्रेता समिती कार्यालय निर्माण करणे १४) पथ विक्रेता तक्रार समिती स्थापन करणे १५) शहरातील वाढत्या उष्णतेमुळे पथ विक्रेत्यांच्यावर होणाऱ्या परिणामांची नोंद घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात उष्माघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन सुविधा उपलब्ध करणे या मागण्यांचा समावेश आहे.

### राज्यातील शिक्षकांना ...

नाही तर जागतिक पातळीपर्यंत पोहोचविण्याचे काम ही संघटना करीत आहे. शिक्षकांच्या न्याय व हक्कासोबतच या संघटनेच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या लाखो गोरगरिबांच्या मुलांचे हितला नेहमीच प्राधान्य दिले असे विचार यावेळी शिक्षक नेते सुरेश भावसार यांनी व्यक्त केले. यावेळी मंचावर राज्याध्यक्ष देविदास बसवदे,शिक्षक नेते सुरेश भावसार राज्य सल्लागार विश्वनाथ सूर्यवंशी, राज्य सरचिटणीस कल्याण लवांडे, कार्याध्यक्ष आण्णा आडे, उपाध्यक्ष किरण पाटील महिला विभाग प्रमुख उर्मिला बोंडे, दिपक भुजबळ ( चंद्रपूर ), भगवान पाटील, अनिल महाजन (पुणे), दिगंबर जगताप (नाशिक), केशव बुरडे, संध्या ठाकरे, संगीता धामृत (अमरावती), सुनील कुर्लेकर, विजय मनवर (वाशिम),शिवानंद सहारकर (नागपुर), व्हि. डी. देशमुख, रमेश सूर्यवंशी (हिंगोली), विलास आळे, स्वप्नील राणे, पद्मशाली डी.एम, शांताराम पाटील, कांचन कडु, जयवंत काळे, शिवाजीराव वाळके आदींची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष डॉ. रवींद्र काकडे यांनी केले तर सूत्रसंचालन महिला विंग च्या जालना जिल्हाध्यक्ष सीमा काकडे यांनी केले. यावेळी जिल्हा सरचिटणीस सुखदेव चव्हाण,राम मेहेत्रे,विजय खरात, भानुदास लोखंडे,सुनिल भालतिलक, नसीम शेख, जितेंद्र कांबळे, विठ्ठल मुंढे, प्रभाकर मुळे, दिपक इंगळे, विजय सदावर्ते, भालचंद्र गंगाधरे,गौतम गवई,सचिन सुरडकर, राजेश रेड्डी,पराग डिक्कर,सुरेश तोटे,राहुल सरकटे, राजेश लोखंडे, संजय निकम, देविदास राजगुरु,रमेश साळवे, गजानन डोमळे सुरेश साळवे, संदिपकुमार गवई,सतिष बोर्ड, राजेश खंदारे,नामदेव सुतार, सिमा काकडे, डॉ. नुतन मघाडे, सारीका जमधाडे, वैशाली देशमुख,श्रीदेवी सुर्यवंशी, विरांगना इंगोले, सुखदा काळे, रंजना सांगळे, उषा चव्हाण,सविता बरंडवाल, ज्योती धनवई लता सपकाळ आदींसह जिल्ह्यातील शिक्षकांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटनेच्या जिल्हा व जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

### राज्यातील भारतीय ...

जबाबदारी दिली त्याच प्रमाणे महाराष्ट्रतील भारतीय मुस्लिम समाजाला गोशाळा चालवण्याची जबाबदारी देण्यात यावी.
आपण धर्मात भेदभाव ठेवू नये, अनेक मुस्लीम समाज बांधव गोशाळा व गोरक्षक होण्यासाठी तयार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांना याबाबतीत आदेश देऊन गोशाळा व गोरक्षकासाठीचे प्रस्ताव मागविण्यात यावे असेही निवेदनाद्वारे म्हटले आहे. निवेदनावर तय्यबबापू देशमुख यांची स्वाक्षरी आहे.

# जिल्ह्यातील वाहतुक तीन दिवसांसाठी पर्यायी वाहतुक मार्गाने वळविली

**जालना । प्रतिनिधी -** श्री गजानन महाराज संस्थान शेगाव या न्यासाची श्री ची पालखी पायदळ वारी परंपरेनुसार सदर पालखी पंढरपुर येथून परतीच्या मार्गावर आहे. या दिंडीमध्ये जवळपास ८०० वारकरी सहभागी आहेत. तरी राष्ट्रीय महामार्गावरील येणारी व जाणारी वाहतूक व्यवस्थेच्या सुनियमनासाठी दि.१९ जुलै ते २१ जुलै २०२५ या कालावधीत वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला आहे.

शनिवार दि.१९ जुलै २०२५ रोजी सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उड्डानपुलाखालून व बाजुने अंबडकडे येणारी अवजड वाहने थांबवून सदरील वाहने पाचोड-अंबड मार्गे जालनाकडे जातील तर जालनाकडून शहागडकडे जाणारी वाहने अंबड -पाचोड मार्गे जातील.

रविवार दि.२० जुलै २०२५ रोजी सकाळी ३ वा जेपासून रात्री ११ वाजेपर्यंत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उड्डानपुलाखालून व बाजुने अंबडकडे येणारी सर्व अवजड वाहने थांबवून पाचोड-जामखेड फाटा-जामखेड-किनगाव चौफुली-बदनापूर मार्गे जालनाकडे जातील तसेच जालनाकडून येणारी वाहने बदनापूर-किनगाव चौफुली-पाचोड मार्गे शहागडकडे जातील. शहापुर ते शहाकड व अंबड ते पाचोड मार्गावरील गावातील अवजड वाहनांनी याच मार्गाचा वापर करावा तसेच पारनेर फाटा ते छत्रपती संभाजीनगर महामार्गापर्यंतच्या गावातील अवजड वाहनांनी याच मार्गाचा वापर करावा.

सोमवार दि.२१ जुलै २०२५ रोजी सकाळी ३ ते रात्री ११ वाजेपर्यंत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उड्डानपुलाखालून व बाजुने अंबडकडे येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंद करुन सदर वाहने वडीगोद्री-पाचोड-जामखेड फाटा-जामखेड-किनगाव चौफुली-बदनापूर मार्गे जालनाकडे जातील. तसेच जालनाकडून येणारी वाहने बदनापूर-किनगाव चौफुली-जामखेड-जामखेड फाटा- पाचोड मार्गे शहागडकडे जातील. तसेच अंबडकडून जालनाकडे जाणारी अवजड वाहने सकाळी ३ ते रात्री ११ वाजेदरम्यान बंद करुन सदर वाहने किनगाव चौफुली-बदनापूर मार्गे जालनाकडे जातील. व जालनाकडून अंबडकडे येणारी अवजड वाहने बदनापूर-किनगाव चौफुली-जामखेड-पाचोड मार्गे शहागडकडे जातील.

दि.१९ जुलै ते २१ जुलै २०२५ या कालावधीत जालनाकडून घनसावंगीकडे जाणारी वाहने रोहनवाडी-सुतगिरणी मार्गे घनसावंगीकडे जातील व घनसावंगीकडून जालनाकडे जाणारी वाहने त्याच मार्गे जालनाकडे जातील. घनसावंगीकडून बीडकडे जाणारी वाहने तिर्थपुरी-गोंदी-शहागड मार्गे बीडकडे जातील. या प्रमाणे पर्यायी मार्गाने वाहतुक वळविण्यात आली आहे. तरी सर्व वाहनधारकांनी याची नोंद घ्यावी. असे असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहेत.

# २६ कोटींच्या घोटाळ्याचा पर्दाफाश

## आमदार लोणीकर यांच्या आढावा बैठकीत परतूर मंठा नेर सेवली वॉटर ग्रीड योजनेतील खोट्या अहवालाची पोलखोल

**मंठा । परतूर । प्रतिनिधी -** परतुर मंठा नेर सेवली वॉटर ग्रीड योजनेतील भयंकर भ्रष्टाचार आणि सरकारी तिजोरीची लूट उघडकीस आणत माजी मंत्री व परतूर मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी आज परतूर आणि मंठा तहसील कार्यालयांमध्ये प्रत्येकी पाच तासांच्या तीव्र आढावा बैठका घेतल्या. या दहा तासांच्या मॅरेथॉन बैठकीत १८६ गावांच्या योजनेत परतूर तालुक्यातील ११, मंठा तालुक्यातील ५१ पैकी २३ आणि नेर-शेवली सर्कलमधील १२ गावे अजूनही पाण्यापासून वंचित असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (चगझ) अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता आणि कार्यकारी अभियंत्यांनी कंत्राटदाराशी हातमिळवणी करून शासनाची दिशाभूल केली. कंत्राटदाराने अपूर्ण काम असतानाही २६ कोटी रुपयांचे बिल लाटले आणि डिपॉझिट उचलून सरकारी तिजोरीला चूना लावला, असा गंभीर आरोप या बैठकीत सिद्ध झाला. लोणीकर यांनी परतूर आणि मंठा पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांसह प्रत्येक गावातील सरपंच आणि ग्रामसेवकांशी सखोल चर्चा करून पाणीपुरवठ्याच्या प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेतला. त्यांनी तयार केलेल्या तपशीलवार अहवालातून जीवन प्राधिकरणाचा खोटा अहवाल उघड झाला. या अहवालाच्या आधारे लोणीकर विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे सरकारला जाब विचारणार आहेत. हा भ्रष्टाचाराचा कळस आहे! ५ लाख लोकांचा पाण्याचा हक्क हिसकावणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना आणि कंत्राटदाराला मी सोडणार नाही. फौजदारी गुन्हे दाखल होईपर्यंत आणि प्रत्येक गावात पाणी पोहोचेपर्यंत हा लढा सुरू राहील, असा इशारा लोणीकर यांनी दिला. त्यांनी लोकप्रतिनिधींना तात्काळ तक्रारी नोंदवण्याचे आणि पाहणी दौऱ्यासाठी तयार राहण्याचे आवाहन केले, जेणेकरून या घोटाळ्याचे मूळ उखडले जाईल आणि गावकऱ्यांना न्याय मिळेल.

परतूर मतदारसंघातील पाणीपुरवठा योजनांमधील अनियमिततांबाबत आमदार बबनराव लोणीकर यांनी घेतलेली कठोर भूमिका आणि त्यांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाने तात्काळ कारवाई केली आहे. परतूर आणि मंठा वॉटर ग्रीड योजनांमध्ये कंत्राटदाराने अपूर्ण काम करून बिल उचलल्याने प्रभारी कार्यकारी अभियंता आर. बी. गाडे, उपअभियंता एम. बी. गायकवाड, एस. एस. पटेल यांच्यासह इतर अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले, तर निवृत्त अभियंते दांडगे आणि गाझी यांच्यावर विभागीय चौकशी सुरू आहे. लोणीकर यांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या प्रधान सचिव आणि सदस्य सचिवांविरुद्ध राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांकडे तक्रार केली होती. ज्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (MJP) ३१ डिसेंबर २०२४ आणि ३ जानेवारी २०२५ च्या आदेशानुसार चौकशी समिती नेमली. या समितीच्या अहवालानंतर २५ एप्रिल २०२५ रोजी निलंबनाची कारवाई झाली. आमदार बबनराव लोणीकर यांनी दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल होईपर्यंत आणि कंत्राटदाराने पुढील महिन्याभरात काम पूर्ण करेपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला होता. यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंते, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी आणि सरपंच उपस्थित होते. लोणीकर यांनी ५ लाख लोकांच्या पाण्याच्या हक्कासाठी कंत्राटदार आणि दोषी अधिकाऱ्यांना माफ न करण्याचा आणि काम पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवण्याचा पुनरुच्चार केला. त्यांनी लोकप्रतिनिधींना त्वरित तक्रारी नोंदवण्याचे आवाहन केले, जेणेकरून पाहणी दौऱ्यादरम्यान समस्यांचे निराकरण होऊ शकेल.

# जीवनात कितीही दुःख आले तरी आत्महत्या करू नका - हभप चंद्रशेखर दर्प



**जालना । प्रतिनिधी -** प्रत्येक माणसाला जीवनात दुःख असते त्याला पर्याय आत्महत्या नसून दुःख दूर करण्यासाठी भगवंताचे नामस्मरण करा जीवनात कितीही दुःख आले तरी आत्महत्या करू नका असे प्रतिपादन हभप चंद्रशेखर महाराज दर्प यांनी कीर्तनात बोलतांना केले ते सरपगव्हाण येथे अखंड हरिनाम सप्ताहात कीर्तनात बोलत होते पुढे बोलतांना महाराज म्हणाले की प्रत्येक साधकाला दुःख नको असते परंतु ते दुःख दूर करण्यासाठी संतांची संगत करा संतांच्या मार्गाने गेल्यास भगवंताची प्राप्ती होते, किर्तन हे मनोरंजनाचे साधन नसून भगवंताच्या प्राप्तीचे साधन आहे किर्तन श्रावनाणे माणसाच्या जीवनाला गती प्राप्त होते. आई-वडील हे भगवंता समान असतात त्यांची सेवा करा तुम्हाला जीवनात कशाचीही कमी पडणार नाही जीवनात कितीही धनसंपत्ती कमवा ती सोबत येत नसून सोबत येते ते भगवंताचे नामस्मरण भगवंताचे नामस्मरण करा तेच तुमच्या अंतःकाळी सोबत येणारे साधन आहे.अनेक संत महाराष्ट्रात होऊन गेले आहेत त्यामुळे महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, माणसाने जीवनात दान केले पाहिजे परंतु सर्वश्रेष्ठ दान आहे ते अन्नदान आहे अन्नदान केले की पुण्य प्राप्त होते भगवंत प्राप्तीसाठी समर्पणाची भावना असली पाहिजे जोपर्यंत समर्पण करीत नाही तोपर्यंत भगवंताची भेट होऊ शकत नाही, आई वडील हे आपल्या मुलांच्या कल्याणाचा विचार करतात परंतु संत हे जगाच्या कल्याणाचा विचार करणारे असतात माणसाची थोडीही प्रगती झाली तर त्याला अहंकार झडतो अहंकार जडला तर भगवंताची प्राप्ती होत नाही असे हभप दर्प महाराज यांनी कीर्तनातून बोलतांना सांगितले.

# मौजे सिरसवाडी येथील युवकांचा भाजपात प्रवेश



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पक्षाच्या जालना कार्यालयात आज सिरसवाडी येथील अनेक युवकांनी पक्षात प्रवेश केला. माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वावर आणि भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या प्रभावी मार्गदर्शनावर विश्वास ठेवून व वंदना ढगे यांच्या सहकार्याने दीपक ढगे, योगेश चांडोल, गणेश झुंबड, ओंकार खंडे, विलास गव्हाड, सार्थक ढगे, प्रेमानंद ढगे, गणेश खंडेकर, विलास ढगे, दिनेश ढगे या युवकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेश प्रसंगी जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी सर्व नवप्रवेशितांचे स्वागत केले. तसेच, पक्षाच्या विचारसरणीला बळकटी देण्यासाठी युवकांनी सक्रीयपणे सहभागी व्हावे व समाज परिवर्तनासाठी भाजपाच्या माध्यमातून कार्य करावे, असे आवाहन केले. यावेळी वंदना ढगे, सिद्धिविनायक मुळे, वसंत शिंदे, मुकेश चव्हाण, ओम कळकुंबे आदींची उपस्थिती होती.

# एच.के.क्रिकेट क्लब तर्फे महाप्रसादी, रक्तदान शिबीर

**जालना । प्रतिनिधी -** येथील एच.के.क्रिकेट क्लब च्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्रावण मासानिमित्त रविवारी ( ता. १३) सकलेचा नगर भागातील भारती लॉन्स येथे महाप्रसादी भंडारा आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

मागील तीन वर्षांपासून एच.के.क्रिकेट क्लबचे सदस्य अमरनाथ यात्रेस जातात अमरनाथ यात्रा करून आल्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादेचे आयोजित केले जाते यंदा महाप्रसादी सोबतच गणेश चौधरी ब्लड डोनर ग्रुपच्या सहकार्याने रक्तदान शिबिर सुद्धा देण्यात आले त्या उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला क्लबच्या सदस्यांसह २१ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. तर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या



यशस्वीतेसाठी एच. के .क्रिकेट क्लबचे हर्षित काबरा, मयूर अग्रवाल, गणेश काबरा, विनय तापडिया, राहुल होलानी, राकेश लोहिया, पवन भुतडा, तुषार शोत्रिय, विशाल वर्मा, गोविंद श्रीमाली, अभिजित मालपाणी, किशोर काबरा, पंकज चेचाणी, कमल जांगीड, आनंद तोष्णीवाल, आशिष दुग्गड, दुर्गेश पांडे, मयूर लड्डा, पंकज जांगीड, सूचित लड्डा, तुषार काबरा, यश बांगड, देवांश गिल्डा, अक्षद अग्रवाल, नारायण लाहोटी, गौरव बांगड, समर्थ तापडिया, शुभम भुतडा, आशिष टोकसिया, अजय नागोरी, साई खत्री, कैलाश जांगीड, पवन बजाज, गोपाल नावंदर, डॉ. रुपेश काबरा, विवेक सोनी, निखिल सारडा, निखिल जैन, कुशल शर्मा, देवेंद्र भुरेवाल, पुरुषोत्तम कोरडे सदस्यांनी परिश्रम घेतले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर मन लावून निबंध लिहिणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन - डॉ. गणेश अग्निहोत्री

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - १०० शिक्षक क्लब ऑफ जालना यांच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त राज्यभर शिक्षकांची निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्याचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. या बक्षीस वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी एमजी जोशी सर हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जे ई एस महाविद्यालय जालना चे प्राचार्य डॉक्टर गणेश अग्निहोत्री हे होते. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक डॉक्टर यशवंत सोनवणे, प्रसिद्ध साहित्यिक हेरकर मॅडम, आदर्श शिक्षक कुडे सर, आदर्श शिक्षक तथा आदर्श शिक्षक निवड समितीचे सरचिटणीस राजेश जोशी, आदर्श मुख्याध्यापक सेवानिवृत्त श्री खरात सर, यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमा त प्रास्ताविक १०० शिक्षक क्लबचे अध्यक्ष राजेभाऊ मगर यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात १०० शिक्षक क्लबचा उद्देश त्याचबरोबर ही स्पर्धा आयोजना मागची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर उद्बोधनपर भाषणामध्ये राजेश जोशी यांनी सर्व शिक्षक क्लबच्या सन्माननीय सदस्यांचा मेहनतीचा उल्लेख करून त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. हेरकर मॅडम यांनी आपल्या साहित्यिक भाषणामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन पटाचा आढावा घेऊन त्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकांचा सुद्धा उल्लेख करत सर्वांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या सारखे साहित्यिक व्हावे ही इच्छा व्यक्त केली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉक्टर गणेश अग्निहोत्री यांनी सखोल असं भाषण केले आणि त्यांनी शिक्षकांना उद्बोधन करताना सांगितले की ज्या शिक्षकांनी या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर मन लावून निबंध लिहिले त्या सर्वांचे या ठिकाणी मी अभिनंदन करतो. शिक्षकांनी जागरूक आणि सजग राहील पाहिजे त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे त्यांच्यामध्ये साहित्यकृती जोपासली पाहिजे हे सुद्धा त्यांनी या ठिकाणी आवर्जून सांगितले. तसेच




अनेक उपक्रम राबवताना निबंध स्पर्धे सारखा विषय आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांवर चा विषय घेऊन सितंबर शिक्षक क्लब यांनी चांगला उपक्रम हाती घेतल्याबद्दल क्लबच्या अभिनंदन सुद्धा केले. सेवाभावी वृत्ती कशी असावी हे सांगताना त्यांनी त्यांच्या गुरुचे उदाहरण देताना हे सांगितले की असेही शिक्षक असतात जे स्वतःच नाव बाजूला ठेवून कार्य करण्यात मग्न असतात अशाही शिक्षकांचा सन्मान झाला पाहिजे. अध्यक्षीय भाषणात एम जी जोशी सर यांच्या विनोदी शैलीतून त्यांनी शिक्षकांना बोधन करताना हेही सांगितले की शिक्षक समाजाचा आरसा असून त्यांनी नेहमी सजग राहील पाहिजे. सामाजिक बांधिलकी ठेवली पाहिजे. विद्यार्थ्याप्रती आपली भावना सजग असली पाहिजे. विद्यार्थ्यांप्रती आपली प्रेमळ भाषा प्रेम जिव्हाळा निर्माण करता आला पाहिजे हे त्यांनी समजावून सांगितले. त्यांनी १०० शिक्षक क्लब यांनी जी निबंध स्पर्धा घेतली त्या सर्व निबंध स्पर्धकांच्या व विजेत्या स्पर्धकांच्या

**पान २ वर**

# धीर धर माणसा, येतील तुझे ही चांगले दिवस!

आजकाल माणसात जरासा ही संयम राहिला नाही. माणूस अविचारी, अधीर, तापट व चिडक्या स्वभावाचा झाला आहे. त्याच्या अशा स्वभावामुळे त्याला जीवनात आलेले अपयश पचवणे अवघड झाले आहे. आलेल्या अपयशावर, संकटावर व अडचणीवर हिंमतीने मात न करता, तो मनातून व आतून पूर्णपणे खचून जात आहे, आणि स्वतःची जीवन यात्रा संपवण्याचा विचार करत आहे. शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या व कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रचंड प्रमाणात वाढल्या आहेत. रोज शेतकरी आत्महत्येची व विद्यार्थी आत्महत्येची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळते. ही समस्त भारतीयांसाठी चिंताजनक व खेदजनक बाब आहे. शाळेतील व कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या वाट्याला अपयश आले तर बहुतांश विद्यार्थी कोणताच मागचा पुढचा विचार न करता आणि थोडासा देखील संयम न बाळगता थेट टोकाचा निर्णय घेऊन स्वतःची जीवन यात्रा संपवत आहेत. त्यांना वाटत असते की, माझ्या वाट्याला आलेले अपयश हे माझी सामाजिक प्रतिष्ठा कमी करणारे आहे. माझ्या शिक्षणावर वारेमाप खर्च करणारे माझे आईवडील मला काय म्हणतील? गावकरी, समाज बांधव व मित्रपरिवार मला काय म्हणेल? मला गावकऱ्यांना तोंड दाखवायला जागा शिल्लक आहे का? आता लोक मला खूप चिडवतील, माझी थट्टा मस्करी करतील आणि मला टोमणे मारतील, असे अनेक वेगवेगळे विचार विद्यार्थ्यांच्या मनात थैमान घालू लागतात. आणि यांना घाबरून हे अविवेकी व अविचारी विद्यार्थी स्वतःला मृत्यूच्या खाईत लोटतात. असला अविचारी व अविवेकीपणा काय कामाचा? अपयशावर आत्महत्या हा पर्याय ठरूच शकत नाही. यशाला काबीज करायचे असेल तर अपयशाच्या वाटेने प्रवास करावा लागतो. आजपर्यंत जे कोणी विद्यार्थी शिक्षण क्षेत्रात यशस्वी झालेत, त्यांच्या वाट्याला एकदा तरी अपयश आलेलेच असते. माणसाला अपयश हे आणखीन जोमाने अभ्यास करण्यासाठी प्रेरणा देणारे असते. हे आमच्या विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यायला हवे. शेतकऱ्यांचा विचार केला तर सध्या महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचे निदर्शनास येत आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे हे एक प्रकारे रास्त आहे. असे काही जणांना वाटत असेल. कारण शेतकरी सध्या निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. बरोबर मग नक्षत्रात पेरणी करून सुद्धा पाऊस वेळेवर पडत नाही. त्यामुळे शेतात पेरलेले काही उगवत नाही.आणि कसेबसे उगवले तर पूर्ण अतिवृष्टीच होते. त्यामुळे उगवलेले पीक हे सगळे भुईसपाट व जमीन दोस्त होते. म्हणजे शेतकऱ्यांच्या नशिबी एक तर दुष्काळ असतो नाहीतर अतिवृष्टी. पावसाने चांगली साथ दिली आणि पिकांची रास चांगली निघाली तर सरकार त्याला हमीभाव देत नाही. नाविलाजाने शेतकऱ्यांना आपला माल कवडीमोल भावाने विकावा लागतो. अगोदरच सावकाराचे कर्ज काढून पेरणीला पैसा लावलेला असतो. घरातील मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न आणि घर प्रपंचाला लागणारा पैसा यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेले असतात. शासन मात्र शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घ्यायला तयार नसतो. शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची दखल घ्यायला तयार नसतो. यामुळे शेतकरी भयभीत व चिंतातूर अवस्थेत असतात. आतून पूर्णपणे खचून जातात, त्यांना आर्थिक टंचाईचा सामना करणे झेपत नसल्यामुळे ते नैराश्यात जाऊन आत्महत्या करतात. सध्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी प्रचंड वाढली आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे योग्य तर नाहीच पण माणूस मनाच्या पुढे जाऊ शकत नाही. माणसाचे मन बदलल्यावर माणूस कोणत्याही थराला जाऊन काहीही करू शकतो. पण मला वाटते की, शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या करण्यापेक्षा त्याचा हिंमतीने मुकाबला करावा. माणसाला जीवन हे बार बार मिळत नसते. आपण जरी मरायचे नको म्हटले तरी, एक दिवस आपल्याला मरण हे येणारच आहे. मरण हे न टळणारी बाब आहे. ते कोणाच्याच बापाला चुकत नाही. स्वतःच्या हाताने मरण्यापेक्षा कधीही नैसर्गिक मृत्यू हा चांगला असतो. शेतकऱ्यांनो, आतून खचून जाण्यापेक्षा, कोणताच मानसिक ताण घेण्यापेक्षा, आलेल्या संकटावर हिंमतीने मात करा. आत्महत्या करण्यापूर्वी आपल्या मुलांचा व आपल्या पत्नीचा विचार करा...काही दिवस निश्चिंत रहा... सगळेच दिवस सारखे नसतात..माणसाच्या जीवनाला कधी कलाटणी मिळेल हे सांगता येत नाही. अशा वेळी मनावर संयम ठेवा..काही तरुण-तरुणी खूप वय वाढल्यामुळे, एक तर वेळेवर लग्नही जुळत नाही आणि नोकरी पण लागत नाही, आता किती दिवस आई-वडिलांच्या जीवावर शिक्षण शिकायचे व बसून खायचे, कुठवर लोकांचे टोमणे ऐकायचे, म्हातारपणापर्यंत नुसते शिकतच राहायचे का? आपली लग्नाची वयोमर्यादा संपल्यामुळे आता आपल्याला कोणी मुलगी पण द्यायला तयार नाही. यामुळे त्यांना स्वतःलाच स्वतःची लाज वाटत असते. त्यांना स्वतःचा कमीपणा वाटतो. आपल्याला लोक काय म्हणत असतील? याची भीती त्यांना अस्वस्थ करत असते...त्यांना प्रचंड मानसिक ताण येतो...आपण जगावे का मरावे? हा प्रश्न निर्माण होतो, काहीजण कमकुवत काळजाचे तरुण तरुणी आत्महत्या करून आपले जीवन संपवतात. तर काही जिगरबाज तरुण-तरुणी हिंमत धरून व संयम ठेवून अभ्यास करतात. आणि स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन मोठ्या पदावर विराजमान होतात. आणि लग्नाला त्यांच्या मागे मुलींची लाईन लागते. हे सत्य आपण कुठेतरी पाहिलंच असेल. जे अपयशाला घाबरून माघार घेतात त्यांना यश कधीच मिळत नाही. पण जे अपयशाला न घाबरता हिंमतबाज बनून सातत्याने प्रयत्न करतात ते जीवनात नक्कीच यशस्वी होतात. म्हणून अपयशाला घाबरून आत्महत्या करण्यापेक्षा त्यावर हिंमतीने व सातत्याने मात करा...यश तुमच्यापुढे चालून येईल... फक्त जिद्द, संयम, चिकाटी व हिंमत बाळगून पुढील वाटचाल करायला हवी. फक्त धीर धर माणसा एक दिवस येतील तुझेही चांगले दिवस. हे वाक्य कायम आपल्या मनात ठेवा...

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**

**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर मो.७४९८७१५६६१**

## जालना जिल्ह्याचा वार्षिक कर्ज योजना आरंभ;
# प्राथमिकता क्षेत्रात ९१ टक्के कामगिरी

**जालना । प्रतिनिधी -** वर्ष २०२५ या आर्थिक वर्षासाठी ७ हजार ७७० कोटीं रुपयांच्या वार्षिक कर्ज योजनेचा शुभारंभ अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्या हस्ते दि.११ जुलै २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला. या कार्यक्रमाअंतर्गत मार्च २०२५ अखेरच्या तिमाहीसाठी जिल्हा सल्लागार समितीची बैठक अपर जिल्हाधिकारी श्रीमती मैत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीत बँकांच्या २०२४-२५ मधील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. विशेषतः पीक कर्जवाटपासह मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना (CMEGP), प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, पंतप्रधान रोजगार योजना (PMEGP), पीएम-फॉर्मलायझेशन ऑफ मायक्रो फूड प्रोसेसिंग एंटरप्राइजेस (PMFME), शेती पायाभूत सुविधा निधी (IF), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) व स्वयं सहाय्यता गट (SHG) यासारख्या योजनांचा आढावा घेण्यात आला.

अग्रणी जिल्हा व्यवस्थापक मंगेश केदार यांनी बैठकीचे संयोजन करताना २०२४-२५ मधील प्राथमिकता क्षेत्रातील एकूण ४ हजार २७० कोटीच्या उद्दिष्टाच्या तुलनेत ३ हजार ८८४ कोटींची ९१ टक्के कामगिरी झाल्याची माहिती दिली. पीक कर्जातील बुडीत कर्जांचे प्रमाण वाढणे आणि नुतनीकरणाची कमी दर ही मुख्य कारणे अपूर्ण कामगिरीसाठी कारणीभूत असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्ह्यातील बँकिंग सेवा तुलनेने कमी असून एका बँक शाखेमागे सरासरी ९ हजार ६०० लोकसंख्या येते, जे की महाराष्ट्र राज्याच्या ६ हजार ३२६ लोकसंख्येच्या सरासरीपेक्षा कमी बँकिंग सुविधा दर्शवते. याबाबत अपर जिल्हाधिकारी व रिझर्व बँकेचे लीड डिस्ट्रिक्ट ऑफिसर अक्षय गोंदेंवार यांनी जिल्ह्यात अधिक शाखा सुरू करण्याचे आवाहन बँकांना केले.

महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रादेशिक व्यवस्थापक एम. जे. पाटील यांनी जिल्ह्यातील शेती कर्जातील बुडीत कर्जाच्या वाढत्या प्रमाणामुळे नफा घटल्याचे स्पष्ट केले. बैठकीदरम्यान विविध योजनांमधील उत्कृष्ट



कामगिरी करणाऱ्या बँकांचा अपर जिल्हाधिकारी श्रीमती मैत्रेवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र ग्रामीण बँक व स्टेट बँक ऑफ इंडिया यांना पीक कर्ज, पीएमएफएमई व सीएमईजीपी अंतर्गत चांगल्या कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले. बँक ऑफ महाराष्ट्रला पीएम विश्वकर्मा योजनेतील सर्वोच्च वाटपासाठी, पंजाब नॅशनल बँकेला सीएमईजीपीमधील चांगल्या कामगिरीसाठी, एचडीएफसी बँकेला महिला स्वयं सहाय्यता गटांमधील (MSRLM²) उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

आर-सेटी संचालक गिरीश सुलताणे यांनी बँकांना आवाहन केले की त्यांनी आरसेटीमधून प्रशिक्षित उमेदवारांना मुद्रा, CMEGP, PMEGP, पीएमएफएमई व अन्य योजनांच्या माध्यमातून आर्थिक मदत करून उद्दिष्ट पूर्ण करावे. अपर जिल्हाधिकारी मैत्रेवार यांनी बँकांना व शासनाच्या विविध यंत्रणांना आवाहन केले की, तालुका स्तरावरील यंत्रणांचा उपयोग करून शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी व अडचणी सोडवाव्यात. भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभागाच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यातील प्रत्येक गावात दि. १ जुलै पासून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत वित्तीय समावेशन शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या शिबिरांदरम्यान प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना (PMJJBY), प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY), अटल पेन्शन योजना (PY) आणि प्रधानमंत्री जनधन योजना (PMJDY) अंतर्गत नागरिक व शेतकऱ्यांनी नाव नोंदणी करावी, असेही सांगितले. या बैठकीस ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. पठारे, महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रादेशिक व्यवस्थापक एम. जे. पाटील, विविध बँकांचे प्रतिनिधी व संबंधित यंत्रणेचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जि.प. व पं.स. सार्वत्रिक निवडणुक; ग्रामस्थांना हरकती, सूचना सादर करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभागाची व कलम ५८ (१)(अ) अन्वये पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणांच्या प्रारुप प्रभाग रचनेबाबत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी शासन आदेशाच्या मसुद्याची जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, सर्व तहसील कार्यालये व पंचायत समिती कार्यालयात फलकावर प्रसिध्द केली आहे. आदेशाच्या मसुद्यास कोणाची हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची सकारण निवेदने, हरकती, सूचना जिल्हाधिकारी यांच्याकडे सोमवार दि.२१ जुलै २०२५ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे. पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणांच्या प्रारुप प्रभाग रचनेबाबतची माहिती जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील फलकावर, जालना येथील जिल्हा परिषदेतील फलकावर, तसेच भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर, जालना, मंठा, परतूर, घनसावंगी आणि अंबड येथील तहसील कार्यालये व पंचायत समिती कार्यालयातील फलकावर प्रसिध्द करण्यात आली आहे. असेही कळविले आहे.

## कारागृहातील बंदीसाठी एड्स जनजागृतीपर कार्यशाळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक (डापकु), जिल्हा रुग्णालयाकडून दि.११ जुलै २०२५ रोजी एचआयव्ही/एड्स व सुरक्षा क्लिनिकविषयी जनजागृतीपर संवेदीकरण कार्यशाळेचे आयोजन जिल्हा कारागृहातील बंदीसाठी करण्यात आले. कार्यशाळेत उपस्थित सर्व बंदींना एचआयव्ही/एड्स व सुरक्षा क्लिनिकविषयी सविस्तर समुपदेशन करण्यात येवून बंदीची एचआयव्ही तपासणीसुध्दा करण्यात आली. यावेळी उपस्थित बंदींच्या शंकेचे निरसनही करण्यात आले. यावेळी तुरुंग अधिकारी मुकुंद जाधव, जगदीश काकड, हरीदास कोल्हे, सुनिल घनसावंत, प्रदीप वाघ, मनिषा जाधव, योगेश राऊत, संदीप लुखे यांच्यासह कारागृहातील बंदीची उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.